FKT VARDI

" मेहनत + सातत्य = कार्यक्रम "

Join telegram - @fktvardi | Follow Instagram - @fktvardi

स्पष्टीकरण पेपर क्र. - 07

1 **स्पष्टीकरण -**

✦ **1) हिमाचल प्रदेश**

☞ बाल शोषण रोखणे हा इंदिरा गांधी सुख शिक्षा योजनेचा उद्देश आहे.

☞ लक्ष्य — विधवा, निराधार महिला, घटस्फोटित महिला आणि अपंग पालकाच्या 23,000 मुलांना कव्हर करणे.

2 **स्पष्टीकरण -**

✦ **2) नवी दिल्ली**

☞ 2024 मध्ये 'पहिली भारतीय सागरी वारसा परिषद' नवी दिल्ली येथे आयोजित करण्यात आली होती.

3 **स्पष्टीकरण -**

✦ **4) नेपाळ**

☞ राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी नेपाळी लष्करप्रमुख अशोक राज सिग्देल यांना मानद जनरल पद प्रदान केले.

☞ अशोक राज सिग्देल यांना त्यांच्या लष्करी पराक्रमासाठी, नेपाळच्या भारतासोबतच्या दीर्घ आणि मैत्रीपूर्ण सबंधाना प्रोत्साहन देण्यासाठी, योगदानासाठी हा पुरस्कार मिळाला .

☞ 1950 पासून नेपाळ आणि भारताच्या लष्करप्रमुखांना मानद जनरल ही पदवी देण्याची परंपरा आहे.

4 **स्पष्टीकरण -**

✦ **2) राहुल नार्वेकर**

☞ महाराष्ट्र विधानसभेच्या अध्यक्षपदी राहुल नार्वेकर यांची निवड झाली आहे.

5 **स्पष्टीकरण -**

✦ **1) "आमचे हक्क , आमचे भविष्य"**

☞ मानवाधिकार दिन 2024 ची थीम आहे "आमचे हक्क , आमचे भविष्य, आत्ता".

☞ हीम थीम मानव हक्क शिक्षण या केवळ मानव अधिकारांचे परिणामकारक उदाहरणे आणि वाजवी उपाय मांडण्याचे उद्दिष्ट आहे..

6 **स्पष्टीकरण -**

✦ **3) $C_6H_{12}O_6$**

☞ ग्लुकोज, साध्या शर्करा (मोनोसॅकराइड्स) म्हणून ओळखल्या जाणाऱ्या कार्बोहायड्रेट्सच्या गटांपैकी एक. ग्लुकोज मध्ये आण्विक सूत्र $C_6H_{12}O_6$ आहे.

7 **स्पष्टीकरण -**

✦ **1) पुणे व मुंबई**

☞ **पुणे व मुंबई या ठिकाणी महिलांसाठी स्वतंत्र तुरुंग आहे.**

8 **स्पष्टीकरण -**

✦ **2) बारामती**

☞ मोरेश्वर (मोरगाव) हे पुणे जिल्ह्यातील बारामती तालुक्यात गणपतीचे देऊळ आहे.

☞ हे देऊळ अष्टविनायकांपैकी एक आहे.

9 **स्पष्टीकरण -**

✦ **1) जिल्हा परिषद अध्यक्ष**

☞ जिल्हा समितीच्या स्थायी समितीचे पदसिध्द अक्ष्यक्ष जिल्हा परिषद अध्यक्ष असतात.

10 **स्पष्टीकरण -**

✦ **4) 21 सप्टेंबर**

☞ 21 सप्टेंबर हा दिवस 'जागतिक अंधश्रद्धा निर्मूलन दिवस' म्हणून साजरा केला जातो.

11 **स्पष्टीकरण -**

✦ **3) शहादा**

- **नंदूरबार जिल्ह्यातील शहादा तालुक्याची सीमा मध्यप्रदेश राज्याला लागून आहे.**
- जिल्ह्यात 6 तालुक्यांचा समावेश आहे. अक्कलकुवा, अक्राणी महाल (ज्याला धडगाव असेही म्हणतात), तळोदा, शहादा, नंदुरबार आणि नवापूर हे तालुके आहेत.

12 **स्पष्टीकरण -**

- 2) राजस्थान
- **होमीओपॅथिक विद्यापीठ' सुरु करणारे पहिले राज्य राजस्थान आहे.**

13 **स्पष्टीकरण -**

- 4) 1 2 3 4

'अ' गट	'ब' गट
अ) बासरी	1) हववेतील कंपने
ब) वारंवारिता	2) Hz मध्ये मोजतात
क) ध्वनीचा पातळी	3) डेसिबल
ड) श्राव्यातील ध्वनी	4) वारंवारिता 20000 Hz पेक्षा जास्त

14 **स्पष्टीकरण -**

- 1) सांगली
- 'बेलवाड डोंगर रांग' सांगली जिल्ह्यात आहे.

15 **स्पष्टीकरण -**

- 3) दिलेरखान
- 'मुरारबाजी तुझ्यासारखा समशेरबहाद्दर मी आजवर पाहिला नाही. तू आमच्या बाजूला ये, कौल घे. बादशहा तुला सरदार करतील. जहागीर देतील, बक्षीस देतील!' हे उद्गार दिलेरखान काढले होते.

16 **स्पष्टीकरण -**

- 2) झांजीबार
- झांझिबार हा लवंगाचे बेट म्हणून ओळखला जाणारा देश आहे.
- हे पूर्व आफ्रिकेत वसलेले आहे.
- या बेटावर लवंगाचे उत्पादन होत असल्याने ते लवंगाचे बेट म्हणून ओळखले जाते.

17 **स्पष्टीकरण -**

- 4) आकाश
- पृथ्वीच्या वातावरणाचा व त्याही पलीकडे नुसत्या डोळ्यांनी पृथ्वीवरुन दिसू शकणारा व छताच्या स्वरुपात भासणारा भाग म्हणजे आकाश होय.
- आकाश किंवा आकाशीय कळस हा वातावरण आणि बाह्य जागेसह पृथ्वीच्या पृष्ठभागाच्या वरच्या बाजूस जे काही आहे ते सर्व आहे.
- खगोलशास्त्राच्या क्षेत्रामध्ये आकाशास आकाशाचे क्षेत्र देखील म्हणतात.
- हे पृथ्वीवर केंद्रीत असलेला एक गोलाकार गोल आहे, ज्यावर सूर्य, तारे, ग्रह आणि चंद्र प्रवास करत आहेत.

18 **स्पष्टीकरण -**

- 1) ओस्लो
- ओस्लो ही नॉर्वेची राजधानी व सगळ्यात मोठे शहर आहे.
- 1624 ते 1924 पर्यंत या शहराचे नाव क्रिस्चियानिया असे होते.
- ओस्लो ही नॉर्वे देशाची राजधानी तसेच सर्वात मोठे शहर तसेच राज्य आहे.

19 **स्पष्टीकरण -**

- 4) पोर्टेबल नेटवर्क ग्राफिक्स
- PNG (पोर्टेबल नेटवर्क ग्राफिक्स) एक फाईल फॉरमॅट आहे जो लॉसलेस इमेज कॉम्प्रेशनसाठी वापरला जातो.
- पीएनजीने ग्राफिक्स इंटरचेंज फॉरमॅट (जीआयएफ) जवळजवळ पूर्णपणे बदलले आहे जे पूर्वी मोठ्या प्रमाणावर वापरले जात होते.

20 **स्पष्टीकरण -**

- 3) आर्जिनिन
- कूर्चाच्या निर्मितीसाठी आर्जिनिन आणि मेथिओनाइन ही महत्त्वाची अमीनो आम्ल आहेत.
- ते वाढीचे घटक आणि वाढ संप्रेरक घटकांच्या संश्लेषणात भूमिका बजावतात.
- **हे हाडांच्या रीमॉडेलिंग आणि विकासामध्ये गुंतलेले आहेत. त्यामुळे हाडांमध्ये आर्जिनिन आणि मेथिओनाइन अमीनो ॲसिड असतात.**

21 **स्पष्टीकरण -**

- 2) पंतप्रधान
- **राष्ट्रीय लोकसंख्या आयोग यांचे पदसिध्द अध्यक्ष पंतप्रधान असतात.**

22 **स्पष्टीकरण -**

- 1) अनुच्छेद - 174
- राज्यपाल वेळोवेळी सभागृहाची किंवा राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहाची त्याला योग्य वाटेल त्या वेळी आणि ठिकाणी बैठकीसाठी बोलावेल, परंतु शेवटच्या बैठकीच्या तारखेच्या दरम्यान सहा महिन्यांचा कालावधी नसावा.

23 **स्पष्टीकरण -**

- 2) चार
- 24 मे 2012 रोजी भारतातील दारिद्ररेषेसंबंधी अभ्यास करण्यासाठी सी. रंगराजन समिती नियुक्त नियुक्त केली होती. या समितीत चार सदस्य होते.
- महेंद्र देव, के. सुंदरम, महेश व्यास, के.एल. दत्ता

24 **स्पष्टीकरण -**

- 3) आरसे
- **सौर कुकरमध्ये सौर ऊर्जा मिळवण्यासाठी आरसे वापरतात.**

- ☞ सोलर कुकरची ओळख या प्रकारच्या कुकरमध्ये अवतल मिरर वापरले जातात कारण हे आरसे सूर्यप्रकाश एका केंद्रबिंदूमध्ये परावर्तित करतात.

25 **स्पष्टीकरण -**

- ✦ 4) पैठण
- ☞ **संत एकनाथ (जन्म : पैठण, इ.स. 1533; - इ.स. 1599) हे महाराष्ट्रातील वारकरी संप्रदायातले एक संत होते. त्यांचा जन्म इ.स. 1533 मध्ये पैठण येथे झाला.**

26 **स्पष्टीकरण -**

- ✦ 1) रुचकर
- ☞ 'बेचव' × रुचकर

27 **स्पष्टीकरण -**

- ✦ 4) अपूर्ण वर्तमानकाळ
- ☞ **'दिवसभर पावसाची रिपरिप चालू आहे.' वाक्याचा काळ अपूर्ण वर्तमानकाळ आहे.**

28 **स्पष्टीकरण -**

- ✦ 3) हेर
- ☞ 'शत्रुकडील बातमी काढून आणणारा' - हेर

29 **स्पष्टीकरण -**

- ✦ 4) उ - ए
- ☞ **विजातीय स्वर उ - ए आहे.**
- ☞ संयुक्त स्वर दीर्घ उच्चाराचे असतात. याशिवाय स्वरांचे सजातीय स्वर व विजातीय स्वर असे उच्चारस्थानांवरून दोन प्रकार पडतात.
- ☞ **सजातीय स्वर** - एकाच उच्चारस्थानातून उच्चारल्या जाणाऱ्या स्वरांना सजातीय स्वर म्हणतात.
- ☞ **विजातीय स्वर** - भिन्न उच्चारस्थानातून उच्चारल्या जाणाऱ्या स्वरांना विजातीय स्वर म्हणतात.

30 **स्पष्टीकरण -**

- ✦ 3) विरस
- ☞ 'हिकमत' = युक्ती, चातुर्य, मसलत.

31 **स्पष्टीकरण -**

- ✦ 3) स्वर संधी
- ☞ 'लंकाधिपती' या सामासिक शब्द स्वर संधीचा प्रकार आहे.
- ☞ एकमेकांशेजारी येणारे वर्ण जर स्वर असतील तर त्यास स्वर संधी असे म्हणतात.

32 **स्पष्टीकरण -**

- ✦ 4) सामान्यनाम
- ☞ 'समिती' हे नाम सामान्यनाम आहे.
- ☞ नाव दिले जाते त्याला ‘‘सामान्यनाम असे म्हणतात.
- ☞ उदा: घर, नदी, झाड, शहर, प्राणी इत्यादी. असे म्हणतात.
- ☞ उदा: हिमालय, गंगा, अशोक, पुणे इत्यादी.

33 **स्पष्टीकरण -**

- ✦ 1) प्रश्नार्थक सर्वनाम
- ☞ **शेंगा <u>कोणी</u> खाल्या?**
  अधोरेखित सर्वनाम प्रश्नार्थक सर्वनाम आहे.
- ☞ ज्या सर्वनामांचा उपयोग वाक्यात प्रश्न विचारण्यासाठी होतो, त्यांना 'प्रश्नार्थक सर्वनामे' म्हणतात.
- ☞ उदा. कोण, काय, कोणास, कोणाला, कोणी इत्यादी.

34 **स्पष्टीकरण -**

- ✦ 2) सम्राज्ञी
- ☞ 'सम्राट'या शब्दाचे स्त्रिलिंगी रुप सम्राज्ञी आहे.

35 **स्पष्टीकरण -**

- ✦ 2) एकेक मुलगा
- ☞ जे संख्याविशेषण त्याचा मूळ अर्थ न दर्शविता वेगळ्या अर्थाचा बोध करुन देते, त्या संख्याविशेषणाला पृथकत्वाचक संख्याविशेषण असे म्हणतात.
- ☞ पृथकत्ववाचक संख्याविशेषणामध्ये एकच गणनवाचक विशेषण दोन वेळा वापरलेले असते.
- ☞ उदा. एक- एक , दोन - दोन, तीन - तीन, एकेक,
- ☞ एकेक मुलगा हे 'पृथकत्ववाचक' संख्याविशेषणाचे उदाहरण आहे.

36 **स्पष्टीकरण -**

- ✦ 4) वासरु
- ☞ वासरु हा शब्द नपुसंकलिंगी आहे.

37 **स्पष्टीकरण -**

- ✦ 3) 3 1 4 2

☞ **'अ' गट**	**'ब' गट**
अ) मी आंबा खाल्ला	1) स्वार्थी
ब) तुला परीक्षेत यश मिळो	2) आज्ञार्थी
क) हे काय तोच करु जाणे	3) विध्यर्थी
ड) जर त्याने मदत केली असती	4) संकेतार्थी

38 **स्पष्टीकरण -**

- ✦ 2) पुरुषवाचक सर्वनाम
- ☞ **आम्ही समजलो, तुमच्या मनात काय आहे ते. हे वाक्य पुरुषवाचक सर्वनामाचे उदाहरण आहे.**
- ☞ सर्वनामांचे प्रकार
- ☞ सर्वनामांचे एकंदर सहा प्रकार मानतात :
- ☞ पुरुषवाचक सर्वनाम
- ☞ दर्शक सर्वनाम
- ☞ संबंधी सर्वनाम
- ☞ प्रश्नार्थक सर्वनाम
- ☞ सामान्य सर्वनाम किंवा अनिश्चित सर्वनाम
- ☞ आत्मवाचक सर्वनाम
- ☞ बोलणाऱ्याच्या किंवा लिहिणाऱ्याच्या दृष्टीने जगातील सर्व वस्तूंचे तीन वर्ग पडतात

- (1) बोलणाऱ्यांचा
- (2) ज्यांच्याशी आपण बोलतो किंवा लिहितो त्यांचा
- (3) ज्यांच्याविषयी आपण बोलतो किंवा लिहितो त्या व्यक्तींचा वा वस्तूंचा.
- व्याकरणात यांना पुरुष (यांत स्त्रियाही येतात.) असे म्हणतात. या तीनही वर्गांतील नामांबद्दल येणाऱ्या सर्वनामांना पुरुषवाचक सर्वनामे असे म्हणतात.
- बोलणारा स्वतःचा उल्लेख करताना जी सर्वनामे वापरतो ती प्रथमपुरुषवाचक सर्वनामे .
- उदा. मी, आम्ही, आपण, स्वतः
- ज्याच्याशी बोलावयाचे त्याचा उल्लेख करताना जी सर्वनामे आपण वापरतो ती द्वितीयपुरुषवाचक सर्वनामे
- उदा. तू, तुम्ही, आपण, स्वतः
- ज्यांच्याविषयी बोलायचे त्या व्यक्ती किंवा वस्तू यांचा उल्लेख करताना जी सर्वनामे वापरतो ती तृतीयपुरुषवाचक सर्वनामे
- उदा. तो, ती, ते, त्या

39 **स्पष्टीकरण -**

- 4) रीतीवाचक
- **वाहन सावकाश चालवावे.**
  अधोरेखित क्रियाविशेषण अव्यय रीतीवाचक प्रकारचा आहे.
- वाक्यातील क्रिया घडण्याची रीत किंवा क्रिया कशी घडते हे दर्शवितात.
- उदा: तो उभ्याने गटागटा पाणी पितो.
- वाहन सावकाश चालवावे.
- कृती करण्याच्या पद्धती किंवा पद्धतीबद्दल सांगणाऱ्या अशा क्रियाविशेषणांना रीतीने क्रियाविशेषण म्हणतात .
- उदा. सावधपणे, पटकन, चुकीचे, नेहमी, खरे, चांगले, काळजीपूर्वक, सावकाश इत्यादी शब्द खाणे, चालणे, बोलणे इत्यादी क्रियांची वैशिष्ट्ये वर्णन करतात.

40 **स्पष्टीकरण -**

- 4) तुलनावाचक
- **पेक्षा, तर, तम, मध्ये, परीस तुलनावाचक शब्दयोगी अव्ययाचे उदाहरण आहेत.**
- शब्दयोगी अव्ययें मुख्यत: नामाला किंवा नामाचें कार्य करणाऱ्या शब्दाला जोडली जातात. पण कधी कधी तीं क्रियापदें व क्रियाविशेषणें यांनासुद्धां लागतात.
- शब्दयोगी अव्यय शब्दाला लागल्यावर बनलेला जोडशब्द त्याच वाक्यातील दुसऱ्या शब्दाशी संबंध दाखवतो.
- शब्दयोगी अव्यय हें अ-व्यय असल्याने त्यामध्यें लिंग, वचन, विभक्तीनुसार कोणताही बदल होत नाही.
- शब्दयोगी अव्यय शब्दाला लागताना, त्या शब्दाचे सामान्य रूप होतें.
- शब्दयोगी अव्ययवाचे खालील प्रकार आहेत.:-
- कालवाचक - आधीं, नंतर, पर्यंत, पावेतों, पुढें, पूर्वी,
- गतिवाचक, आंतून, खालून, पर्यंत, पासून, मधून, .
- स्थलवाचक - अलीकडे, आत, जवळ, ठायीं, नजीक, पाशींपुढें, बाहेर, मध्यें, मागें, समोर,
- करणवाचक - कडून, करवीं,करून, द्वारां, मुळे, योगे, हातीं
- हेतुवाचक - अथा, करिता, कारणें, निमित्त, प्रीत्यर्थ, साठीं, स्तव
- व्यक्तिरेखा वाचक - खेरीज, परतां, वाचून, विना, व्यक्तिरिक्त, शिवाय,
- **तुलनावाचक - तम, तर, परीस, पेक्षा, मध्ये,**
- योग्यतावाचक - प्रमाणें, बरहुकूम, सम, समान, सारखा, योग्य,
- कैवल्यवाचक - केवळ, ना, पण, फक्त, मात्र,
- संग्रहवाचक - केवळ, देखील, पण, फक्त, बारीक, सुद्धा, ही,
- संबंधवाचक - विशीं, विषयीं
- साहचर्यवाचक - बरोबर, सह, संगें, सकट, सहित, सवें, निशी, समवेत
- भागवाचक - आतून, पैकीं, पोटीं,
- विनिमयवाचक - ऐवजी, जागी, बदली, बद्दल,
- दिकवाचक - कडे, प्रत, प्रति, लागी
- विरोधावाचक - उलटविरुद्ध, वीण,

41 **स्पष्टीकरण -**

- 1) साधित विशेषण
- 'काल मी मावळणारा सूर्य पाहिला.'
  या वाक्यातील 'मावळणारा' हा साधित विशेषणाचा प्रकार आहे.
- मूळ विशेषण सोडून इतर जातीच्या शब्दांपासून तयार केलेल्या विशेषणांना साधित विशेषणे म्हणतात.

42 **स्पष्टीकरण -**

- 4) अथवा
- अथवा हे उभयान्वयी अव्यय आहे.
- दोन किंवा अधिक शब्द किंवा वाक्य जोडणाऱ्या शब्दांना उभयान्वयी अव्यय असे म्हणतात
- उदा. तेव्हा, की, आणि, व, शिवाय, आणिक, अन, अथवा.

43 **स्पष्टीकरण -**

- 3) अरेरे
- **'अरेरे ! काय दशा झाली त्याची !**
  या वाक्यामध्ये 'अरेरे !' हे केवलप्रयोगी अव्यय आहे.
- आपल्या मनातील भावना दाटून आल्यावर तोंडावाटे अचानकपणे जे उदगार बाहेर पडतात. त्यांना उदगारवाची शब्द किंवा केवलप्रयोगी अव्यय असे म्हणतात.
- संमतिदर्शक - ठीक ,हां ,जीहा ,जी ,बराय इ.
- आश्चर्यदर्शक : अबब, बापरे, अरेच्चा.

44 **स्पष्टीकरण -**

- 1) होय

रोज एक नवीन फ्री पोलीस भरती सराव पेपर

सोडवण्यासाठी fktvardi टेलिग्राम चॅनेल जॉईन करा

टेलिग्राम वर सर्च करा -@fktvardi

आणि जॉईन करा

☞ 'त्यांच्यासारखा विद्वान तोच !
या वाक्यातील योग्य असलेले क्रियापद **होय** आहे.

45 **स्पष्टीकरण -**

✦ 2) जोडवी

☞ 'जोडवे' या शब्दाचे अनेकवचन जोडवी आहे.

46 **स्पष्टीकरण -**

✦ 2) क्रियाविशेषण

☞ **'वारा जोराने वाहत होता' अधोरेखित शब्दाची जात क्रियाविशेषण आहे.**

☞ क्रिये विषयी विशेष माहिती सांगणाऱ्या अविकारी शब्दाला क्रियाविशेषण अव्यय असे म्हणतात.

☞ क्रिया केव्हा, कधी ,कितीवेळा घडली हे सांगणारे अविकारी शब्द म्हणजे क्रियाविशेषण अव्यय होय.

☞ उदा. कधीकधी, नेहमी, वारंवार, आज ,मागून, भरभर, पटकन, थोडा, सकाळी इत्यादी.

47 **स्पष्टीकरण -**

✦ 1) दुकाना

☞ **'दुकान' या शब्दाचे सामान्यरुप दुकाना आहे.**

☞ नामाला किंवा सर्वनामाला विभक्तिप्रत्यय किंवा शब्दयोगी अव्यय लागण्यापूर्वी त्याचे जे रूप होते त्याला 'सामान्यरूप' असे म्हणतात.

48 **स्पष्टीकरण -**

✦ 2) स्वरुपबोधक उभयान्वयी अव्यय

☞ **ज्ञानेश्वर म्हणून एक संत होऊन गेले.**
अधोरेखित शब्द स्वरुपबोधक उभयान्वयी अव्ययाचा प्रकार आहे.

☞ प्रधान वाक्याला गौण वाक्याशी जोडून त्याचे स्वरूप उलगडून सांगणारे उभयान्वयी अव्यय म्हणजे स्वरूपबोधक उभयान्वयी अव्यय होय.

☞ स्वरूपबोधक उभयान्वयी अव्ययांची काही उदाहरणे

☞ म्हणजे, की, म्हणून, जे.

49 **स्पष्टीकरण -**

✦ 2) 3 1 4 2

विभक्ती	**कारक**
अ) पंचमी	1) घराहून
ब) तृतीया	2) घराशी
क) षष्ठी	3) घराचा
ड) सप्तमी	4) घरात

50 **स्पष्टीकरण -**

✦ 2) नृसिंहावतार

☞ 'अतिशय उग्र स्वरुप धारण करणारा' - नृसिंहावतार.

51 **स्पष्टीकरण -**

✦ 1) $\frac{45}{10}$

☞ महेशने 20 पैकी 9 गोट्या विद्याला दिल्या, हे दर्शवणारा अपूर्णांक $\frac{9}{20}$ हा आहे.

$$\frac{9}{20} = \frac{9\times5}{20\times5} = \frac{45}{100}$$

52 **स्पष्टीकरण -**

✦ 3) 222

☞ सम संख्यांच्या वाख्यानूसार संख्येच्या एक स्थानिक 0, 2, 4, 6, 8 यापैकी अंक असेल, तर त्याला सम संख्या म्हणतात.

53 **स्पष्टीकरण -**

✦ 4) 0.05 मी.

☞ 1.53 - 1.48 = 0.05 मी.
दोघांच्या उंचीतील फरक **0.05 मी.** आहे.

54 **स्पष्टीकरण -**

✦ 4) 10 वर्ष

☞ 30 मुलांचे सरासरी वय = 8 वर्ष
बेरीज = सरासरी × एकूण संख्या
30 मुलांचे एकूण वय = 8 × 30 = 240
40 मुलांचे सरासरी वय = 8 वर्ष 6 महिने
8 वर्ष 6 महिने = 8.5 वर्ष
40 मुलांचे एकूण वय = 8.5 × 40 = 340
नविन 10 मुलांचे एकूण वय =
40 मुलांचे वय - 30 मुलांचे वय
= 340 - 240 = 100
नविन 10 मुलांची सरासरी = $\frac{100}{10}$ = **10 वर्ष**

55 **स्पष्टीकरण -**

✦ 1) शुन्य कि.ग्रॅ.

☞ 1 क्विंटल = 10 कि.ग्रॅ.
35 पोत्यांमधील गव्हाचे वजन = 35 × 100 = 3500 कि.ग्रॅ.
70 पोत्यांमधील साखरेचे एकूण वजन =
70 × 50 = 3500 कि.ग्रॅ. गहू व साखर दोन्हींचे वजन समान आहे.

∴ त्यांच्या वजनातील **फरक शून्य** आहे.

56 **स्पष्टीकरण -**

✦ 4) 82,000 रु.

☞ स्कुटीची किंमत 40,000 रु. आहे.
होंडाची किंमत 40,000 + 2000 = 42,000 रु. होईल.
दोन्हींची एकूण किंमत 42000 + 4000 = **82,000** रु. होईल.

57 **स्पष्टीकरण -**

✦ 4) 3

☞ 24 कागद = 2 डझन कागद = 1 दस्ता

6 डझन कागद = 6 ÷ 2 = **3 दस्ते**

58 **स्पष्टीकरण -**

✦ 2) 2560 रु.

☞ प्रती चौरस मीटरला 5 रु., तर 512 चौ.ला किती?

512 × 5 = **2560 रु.**

59 **स्पष्टीकरण -**

✦ 3) 17, 71

☞ पर्यायावरुन उत्तर काढा.

प्रश्नात सांगितल्याप्रमाणे 4 (पहिली संख्या)

दुसरी संख्या - 3

i.e. 4 × 17 = 71 - 3

68 = 68

व दोन संख्येतील फरक

71 - 17 = 54

60 **स्पष्टीकरण -**

✦ 3) 14 रु.

☞ पेन व पुस्तक यांची एकूण किंमत 30 रु. आहे.

पुस्तकांची किंमत पेनच्या किमतीपेक्षा 16 रुपयने जास्त आहे

∴ 30 मधून 16 वजा करु. 30 - 16 = 14

म्हणजे एका पेनची किंमत + एका पुस्तकाची किंमत

7 + (7 + 16)

एका पेनची किंमत 7 रुपये व एका पुस्तकाची किंमत 23 रु.

दोन पेनांची किंमत 7 × 2 = **14 रु.**

61 **स्पष्टीकरण -**

✦ 3) 4989.6 रु

☞ रमेश 82% खर्च म्हणजेच

100 रु. वर 82 रु. खर्च करतो म्हणजेच 18 रु. बचत करतो.

100 रु. : 18 रु. तर

∴ 27720 : ?

$\frac{27720 \times 18}{100} = 4989.6$

62 **स्पष्टीकरण -**

✦ 3) 200 रु.

☞ 1 टेबल + 2 खुर्ची = 400 .... (1)

2 टेबल + 1 खुर्ची = 500 .... (2)

समजा, टेबल = x, खुर्ची = y

x + 2y = 400 .... (1)

2x + y = 500 .... (2)

दुसऱ्या उदाहरणास 2 ने गुणा, तर

x + 2y = 400

4x + 2y = 1000

\- \- \-

\--------------------

\- 3x = - 600

x = 200

म्हणजे, **टेबल = 200** व खूर्ची = 100 रुपये

63 **स्पष्टीकरण -**

✦ 4) 70000

☞ 75031 या संख्येमध्ये 7 हा अंक दशसहस्त्र स्थानी आहे.

7 या अंकाची स्थानिक किंमत = **70000**

64 **स्पष्टीकरण -**

✦ 3) 65 कि.मी.

☞ ताशी वेग किती?

वेग = $\frac{\text{अंतर}}{\text{वेळ}}$

वेग = $\frac{390}{6}$ कि.मी. / तास

वेग = 65 कि.मी. / तास

65 **स्पष्टीकरण -**

✦ 1) 6

☞ $\sqrt{\frac{36\times4}{4}} = 6$

66 **स्पष्टीकरण -**

✦ 2) 20, 30

☞ समजा दिलेल्या गुणोत्तराची समानपट x मानू

पहिली संख्या 2 x, आणि दुसरी संख्या 3 x

दिलेल्या अटीनुसार

$\frac{2x+5}{3x+5} = \frac{5}{7}$ तिरपे गुणून

14 x + 35 = 15 x + 25

14 x - 15 x = 25 - 35

\- x = - 10

x = 10

पहिली संख्या 2x = 2 × 10 = **20**

दुसरी संख्या 3x = 3 × 10 = **30**

67 **स्पष्टीकरण -**

✦ 1) 26

☞ आशाचे वय 12 वर्षापूर्वी 25 होते.

सध्याचे वय = 25 + 12 = 37 वर्ष

तर तिचे 63 वर्ष वय = 63 - 37

आशाचे वय 63 हे = **26** वर्षांनी होईल.

68 **स्पष्टीकरण -**

✦ 2) 39.5 सें.मी. ^{2}

☞ येथे, l = 4 सें.मी., b = 2.5 सें.मी, h = 1.5 सें.मी.

आगपेटीला बाहेरुन चिकवटवायच्या रंगीत कागदाचे क्षेत्रफळ

= इष्टिकाचितीचे (आगपेटीचे) एकूण पृष्ठफळ

$= 2 (lb + bh + lh)$

$= 2 (4 \times 2.5 + 2.5 \times 1.5 + 4 \times 1.5)$

$= 2 (10.0 + 3.75 + 6.0)$

$= 2 (19.75) = 39.5$ सें.मी. ^{2}

एकूण **39.5** सें.मी. ^{2} रंगीत कागद लागेल.

---

69 **स्पष्टीकरण -**

✦ 1) 21

☞ $1100 \times \frac{x}{100} = 3300 \times \frac{7}{100}$

$X = 3 \times 7 =$ **21**

---

70 **स्पष्टीकरण -**

✦ 3) 225

☞ चौरसाची परिमिती = 4 × बाजू

बाजू = x मानू

4 x = 60

$x = \frac{60}{4} = 15$

x = 15 परंतू x ही बाजू आहे.

चौरसाचे क्षेत्रफळ = (बाजू) ^{2}

$x^2 = (15)^2 =$ **225**

---

71 **स्पष्टीकरण -**

✦ 2) 23,02,750 रु.

☞ आयताकृती भूखंडाचे क्षेत्रफळ = लांबी × रुंदी

$= 75.5 \times 30.5 = 2302.75$ मी ^{2}

भूखंडाची किंमत = दर × भूखंडाचे क्षेत्रफळ

= 1000 × 2302.75 = 2302750 रु.

भूखंडाची किंमत = **23,02,750 रु.**

---

72 **स्पष्टीकरण -**

✦ 4) 225

☞ घनमीटर = 15 × 3 × 5 = **225 घन मीटर**

---

73 **स्पष्टीकरण -**

✦ 1) 10

☞ $70 = 2 \times 5 \times 7$

$80 = 2 \times 2 \times 2 \times 2 \times 5$

$90 = 2 \times 3 \times 3 \times 5$

मसावि = 2 × 5 = **10**

---

74 **स्पष्टीकरण -**

✦ 1) 24 सें.मी. ^{2}

☞



पायथागोरस सिंध्दांत

कर्णाचा वर्ग = दोन्ही बाजूच्या वर्गाची बेरिज

$(AC)^2 = (AB)^2 + (BC)^2$

$(10)^2 = (8)^2 (x)^2$

$100 = 64 + x^2$

$100 - 64 + x^2$

$36 = x^2$

$x = 6$

तर, त्रिकाणाचे क्षेत्रफळ = $\frac{1}{2}$ × पाया × उंची

$= \frac{1}{2} \times 6 \times 8 =$ **24 सें.मी.** ^{2}

---

75 **स्पष्टीकरण -**

✦ 2) 210

☞ $14^2 = 14 \times 14 = 196$

= 196 + 14 = **210**

---

76 **स्पष्टीकरण -**

✦ 4) U

☞ ‘A’ पासून पाचव्या क्रमांकावर ‘F’ आहे, तर ‘P’ पासून पाचव्या क्रमांकावर ‘U’ आह

---

77 **स्पष्टीकरण -**

✦ 4) 48 J 23

☞



78 **स्पष्टीकरण -**

✦ 2) 256

☞



79 **स्पष्टीकरण -**

✦ 3) वडील

☞ राजन कुमारचा मुलगा आणि कुमार रजनीचे सासरे. म्हणजे रजनी राजनची पत्नी आहे. शीला रजनीची मुलगी म्हणजे राजनचीही मुलगी. यावरुन राजन हे शीलाचे वडील आहेत.

80 **स्पष्टीकरण -**

✦ 4) T V X

☞



81 **स्पष्टीकरण -**

✦ 4) 441

☞ 197, 168, 214 या तीन संख्या वर्ग नाहीत मात्र 441 हा मात्र 21 चा वर्ग आहे.

82 **स्पष्टीकरण -**

✦ 2) 28

☞



83 **स्पष्टीकरण -**

✦ 4) REKTYV

☞



84 **स्पष्टीकरण -**

✦ 1) 121

☞ रमेशच्या समोर 5 मुले आहेत म्हणजे मागे सुध्दा पाचच मुले राहतील कारण तो मध्यभागी आहे.

म्हणजे एका रांगेत 5 + 5 + 1 = 11 मुले आहेत.

रांगा व रांगेतील मुलांची संख्या समान आहे.

एकूण् मुले = रांगा × एका रांगेतील मुले

= 11 × 11 = 121

85 **स्पष्टीकरण -**

✦ 3) मीटर

☞ कारण इतर वजनाची एकके आहेत व मीटर हे लांबीचे एकक आहे.

86 **स्पष्टीकरण -**

✦ 3) 324

☞ $(\sqrt{25}+\sqrt{1}+\sqrt{81}+\sqrt{16})^2 = 361$

$(\sqrt{4}+\sqrt{16}+\sqrt{9}+\sqrt{64})^2 = 289$

$(\sqrt{9}+81\sqrt{25}+\sqrt{1})^2 = 324$

87 **स्पष्टीकरण -**

✦ 3) बुधवार

☞ 1996 लिप वर्ष असल्यामुळे समोरील वर्ष दोन दिवसांनी समोर जाईल.

∴ सोमवार → मंगळवार → **बुधवार**

88 **स्पष्टीकरण -**

✦ 2) 36

☞ सर्व सळयांची लांबी 13 च्या पटीत आहे.

म्हणून 13 सें.मी. हा सगळ्यात मोठा तुकडा येईल, तर एकूण तुकडे?

$\frac{78}{13} = 6, \frac{104}{13} = 8, \frac{117}{13} = 9, \frac{169}{13} = 13$

6 + 8 + 9 + 13 = 36

एकूण 36 तुकडे होतील

89 **स्पष्टीकरण -**

✦ 4) 77.5^0

☞ 2 : 25 वा

कोन = तास × 30 - $\frac{11}{2}$ × मिनिटे

$= 2 \times 30 - \frac{11}{2} \times 25$

$= 60 - \frac{275}{2}$

= 60 - 137.5

= - 77.5

ऋण चिन्ह सोडून द्यावे

कोन = 77.5

90 **स्पष्टीकरण -**

✦ 3) 40

☞ समजा वडिलांचे सध्याचे वय x,

मुलाचे सध्याचे वय = x - 30

5 वर्षानंतर वडिलांचे वय = x + 5 आणि

मुलाचे वय = x - 30 + 5 = x - 25 होईल

5 वर्षानंतर वडिलांचे वय मुलाच्या वयाच्या तीनपट होते.

x + 5 = 3 (x - 25) ⇒ x + 5 = 3x - 75

5 + 75 = 3x - x ⇒ 80 = 2 x ⇒ $\frac{80}{2}$ = x

X = 40 वर्ष

91 **स्पष्टीकरण -**

✦ **2) दोन्ही असत्य**

☞



अनुमान (क) अयोग्य , (ड) अयोग्य

92 **स्पष्टीकरण -**

✦ 2) 75

☞ 500 कुटूंब × 15 दिवस = 100 कुटूंब × x दिवस

X = 75

93 **स्पष्टीकरण -**

✦ 3) S

☞



94 **स्पष्टीकरण -**

✦ **2) 3 कि.ग्रॅ.**

☞ पूर्ण भरलेले असताना = 25 कि.ग्रॅ.

अर्धे रिकामे केले = 14 कि.ग्रॅ.

म्हणजे अर्ध्या पाण्याचे वजन = 11 कि.ग्रॅ.

पूर्ण पाण्याचे वजन = 11 × 2 = 22

बादलीचे वजन = **3 कि.ग्रॅ.**

95 **स्पष्टीकरण -**

✦ 4) 251

☞ 1 किलोमीटर = 1000 मीटर

जर प्रत्येक झाडे 4 मीटर झाडे लावतील तर,

एकूण झाडे = $\frac{1000}{4}$ + 1 = 250 + 1

एकूण झाडे = **251**

96 **स्पष्टीकरण -**

✦ **4) उत्तर**

☞



97 **स्पष्टीकरण -**

✦ 1) 7 - 15 - 15 - 4 - 23 - 9 - 12 - 12

☞

G	O	O	D	W	I	L	L
↓	↓	↓	↓	↓	↓	↓	↓
7	15	15	4	23	9	12	12

98 **स्पष्टीकरण -**

✦ 3) 23

☞ 27 + 43 + 30 = 100

42 + 49 + 9 = 100

x + 35 + 42 = 100

x + 77 = 100

$x = 100 - 77$

$x = 23$

---

99 **स्पष्टीकरण -**

- 1) **सिध्दीविनायक**
- लेण्याद्री, सिद्धटेक आणि मोरगाव ही अष्टविनायकाची स्थाने आहेत, तर सिध्दीविनायक हे गणपतीचे नाव आहे.

---

100 **स्पष्टीकरण -**

- 2) 0.018
- $0.36 \times 2.5 \times 0.02 = ?$

  $0.36 \times 2.5 = 0.9$

  $0.9 \times 0.02 = 0.018$

.

ALL THE BEST

.

लक्ष्य करिअर अकॅडमी पुणे

रोज एक नवीन फ्री पोलीस भरती सराव पेपर

सोडवण्यासाठी fktvardi टेलिग्राम चॅनेल जॉईन करा

टेलिग्राम वर सर्च करा -@fktvardi

आणि जॉईन करा